# स्वा.सै. वसंतराव बोंद्रे- गुर्जर यांचा ९ ऑगस्ट रोजी सत्कार संपन्न

स्वातंत्र्यसैनिक आणि शतायुषी वसंतराव वासुदेव बोंद्रे-गुर्जर यांचा क्रांतिदिनी म्हणजेच दि. ९ ऑगस्ट रोजी दिल्ली येथे राष्ट्रपती भवनात राष्ट्रपतींच्या हस्ते सत्कार संपन्न झाला. दि. ९ ऑगस्ट हा बोंद्रे-गुर्जर यांचा वाढदिवस असून, यंदाचा त्यांचा शंभरावा वाढदिवस दिल्लीत राष्ट्रपती भवनात संपन्न झाला.



१९३० मध्ये वयाच्या १४ व्या वर्षी बोंद्रे-गुर्जर यांनी स्वातंत्र्यलढ्यात सहभाग घेतला. शाळेत असतानाच महात्मा गांधींच्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत त्यांनी उडी घेतली. इंग्रजी शाळेवर बहिष्कार घातला. मिठाच्या सत्याग्रहात भाग घेतला. शिरोडा येथील मिठागरातून आणलेले मीठ इंग्रज सरकाने बेकायदा ठरविले. ते विकण्याचे काँग्रेसने ठरविले. वसंतराव व अन्य सेवकांनी ते विकण्यास सुरुवात केली. त्यामुळे वसंतरावांसह स्वयंसेवकांना पकडण्यात आले. त्यांना एक महिन्याची शिक्षा झाली.

पुढे म. गांधींनी दारूबंदी सत्याग्रह सुरू केला. पिकेटिंग करताना वसंतराव पुन्हा पकडले गेले आणि पंधरा दिवस तुरुंगवास घडला. १९३० मध्ये सुरू केलेल्या खानेसुमारीवर काँग्रेसने बहिष्कार घातला व घरोघरी खानेसुमारीविरुद्ध प्रचार करताना तसेच घराघरांवर लिहिलेले नंबर डांबराने पुसून टाकताना वसंतराव पकडले गेले व पुन्हा महिनाभर तुरुंगवास घडला.

**भूमिगत राहून कार्य**

१९४२ मध्ये 'छोडो भारत' चळवळीत वसंतरावांनी सक्रिय सहभाग घेतला. पोस्ट कार्यालये बंद पाडली. टपालपेट्या फोडून पत्रे जाळली. मामलेदार कचेरी, म्युनिसिपालिटीवरील युनियन जॅक काढून तिरंगा फडकविला. भूमिगत राहून वसंतराव ही चळवळ सहकाऱ्यांसमवेत करीत होते. डॉ. हर्डीकर, रंगाराव दिवाकर, रामराव हुक्केरीकर, गंगाधरराव देशपांडे या नेत्यांना विनाचौकशी तुरुंगात ठेवण्यात आले. म. गांधींच्या संदेशाची बुलेटिन्स 'सायक्लोस्टाइल' करून शहरभर भिंतीवर चिकटविण्याचे काम वसंतराव व त्यांचे सहकारी करीत असताना ते पकडले गेले. विनाचौकशी सात-आठ महिने हिंडलगा कारागृहात त्यांना डांबण्यात आले. स्वातंत्र्योत्तर काळातही वसंतरावांनी समाजसेवा सुरू ठेवली. कऱ्हाडे ब्राह्मण संघाची स्थापना, नंतर त्याचे केलेले पुनरुज्जीवन, व्यापारी कामगार संघाची स्थापना, ज्येष्ठ नागरिक संघाची स्थापना, सत्संग मंडळाची स्थापना, पत्राद्वारे, दासबोध अभ्यासाची सुरुवात केलेली बेळगाव शाखा, योगशिक्षणाचे वर्ग आदी उपक्रम वसंतरावांनी सुरू केले आणि सातत्याने ते चालू ठेवले.

गेल्या वर्षी वसंतरावांना सत्कारासाठी आमंत्रित करण्यात आले होते. मात्र कागदपत्रांची जुळवाजुळव न झाल्याने आणि स्वातंत्र्यलढ्याशी संबंधित फोटो मिळाले नसल्याने जाता आले नाही, असे त्यांचे चिरंजीव सुहास गुर्जर यांनी सांगितले. वसंतरावांच्या शतायुषी आयुष्याची विचारणा केली असता वसंतरावांनी निर्व्यसनी, ध्यानधारणा, योगाभ्यास असे उत्तर दिले. साधेपणाने राहणे आणि दुसऱ्याकरिता काहीतरी करावे, स्वतःचा स्वार्थ न बघता दुःखी लोकांना सुखी करावे, असा संदेश त्यांनी दिला.

वसंतरावांचे शरीर थकले तरी मन थकलेले नाही, आजही जुन्या आठवणी त्यांच्या स्मरणात आहेत. तर दृष्टी चांगली आहे. चेंबर ऑफ कॉमर्सचे ते सदस्य असताना तत्कालीन उपराष्ट्रपती राधाकृष्णन आले होते, याची त्यांनी प्रकर्षाने आठवण करून दिली.

## वयाच्या ५७ व्या वर्षी दहावी उत्तीर्ण

**वसंतरावांना शिक्षणाची आवड होती; परंतु परिस्थितीमुळे त्यांना शक्य झाले नाही. मात्र त्यांनी हार मानली नाही. १९७३ मध्ये वयाच्या ५७ व्या वर्षी सरदार्स हायस्कूलमध्ये त्यांनी दहावीची परीक्षा दिली व ते उत्तीर्ण झाले.**

## पंडित सुरेश तळवलकर यांना 'तालविश्व'चा पुरस्कार प्राप्त

'तालविश्व'चा तालविश्व उस्ताद मेहबूब खानसाहेब मिरजकर पुरस्कार पंडित सुरेश तळवलकर यांना पालकमंत्री गिरीश बापट यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

तबलावादक मेहबूब खानसाहेब मिरजकर यांच्या ५० व्या आणि तबलावादक महंमद हनीफ खानसाहेब मिरजकर यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त 'गुरू-शिष्य आणि संगीताचा वारसा जपणाऱ्या दोन पिढ्या' ही संकल्पना घेऊन 'संगीत विरासत' कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यात ज्येष्ठ तबलावादक रशीद मुस्तफा थिरकवा आणि त्यांचे सुपुत्र शरीफ मुस्तफा यांच्यात तबलावादनाची, तर सरोदवादक राजन कुलकर्णी आणि त्यांचे सुपुत्र सारंग कुलकर्णी यांच्यात सरोदवादनाची जुगलबंदी रसिकांनी अनुभवली. त्यानंतर सुरेश तळवलकर आणि त्यांच्या कन्या सावनी तळवलकर यांचे तबलावादन झाले.

